दिनांक : १0.0४.२0२४

# माधवी ओगले व्यावसायिक शाळा ( MOVS )
## वार्षिक अहवाल २0२४ - २0२५

मुख्याध्यापिका, ७ शिक्षक, ३ मावश्या, १ काका व ३ ताई व २ दादा मदतनीस कार्यरत आहे.
शाळेत एकूण ४0 विद्यार्थी आहेत.

दि. १0 जून २0२४ रोजी पासून शाळा नेहमीप्रमाणे सुरू झाली.

शाळेत एकूण विद्यार्थ्यांच्या क्षमतेचा विचार करून ४ वर्गाची आखणी केली आहे. त्या व्यतिरिक्त खेळ, क्राफ्ट, शारीरक व्यायाम, योगा, गायन या ॲक्टिव्हिटी विद्यार्थ्यांच्या गरजेप्रमाणे चालू आहे. विद्यार्थ्यांच्या क्षमतेप्रमाणे एप्रिलमध्ये अभ्यासक्रमाची आखणी केली जाते. विद्यार्थ्यांना वहया, शैक्षणिक साहित्य पुरविले जाते. अभ्यासक्रमाचे पुस्तक छापून विद्यार्थ्यांना देण्यात आले आहे.

दरवर्षी प्रमाणे चालणारे सर्व उपक्रम नियमीत सुरू होते.

नविन प्रवेश

- यावर्षी बाहेरील एकूण ४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. तर लार्क शाळेतून ३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

सांस्कृतिक कार्यक्रम

- दि. 0१ जून २0२४ रोजी संस्थेचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी वेन्यू ट्रेनिंग इन्स्टिटयूटच्या मुख्याध्यापिका विद्या भागवत यांनी ललित लेखनाचे अभिवाचन केले. संस्थेचे विश्वस्त, पदाधिकारी व सर्व शिक्षक वर्ग उपस्थित होता.
- नागपंचमी निमित्त विद्यार्थ्यांनी मातीकामातून विविध वस्तू तयार केल्या.
- ऑगस्ट, फेब्रुवारी मध्ये सेफ्टी ड्रील घेण्यात आले. सेफ्टी ड्रील घेतल्यामुळे अचानक आलेल्या आपत्ती मध्ये कसे वागावे याची माहिती होते.
- दि. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला.
- दि. 0५.0९.२0२४ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी सर्व शाळेचे व लार्क शाळेचे कामकाज पाहिले. एम.ओ.व्ही.एस शाळेतील विद्यार्थ्यांनी बनविलेली कागदी फ्रेम भेट म्हणून देण्यात आली. प्रिझम फौंडेशन कडून सर्व शिक्षकांना भेटवस्तू देण्यात आली.

- दि. ०९ ते १३.०९.२०२४ कालावधीत गणेशोत्सव साजरा करण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी डेकोरेशनसाठी सहकार्य केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने मठरी तयार केली व ती प्रसाद म्हणून देण्यात आली. हा प्रसाद शिक्षक व मावशी यांच्या तर्फे दिला होता. गणेश विसर्जनाची तयारी शाळेकडे होती. विद्यार्थ्यांनी ढोल ताशांच्या तालावर लेझीम खेळून गणपती विसर्जन केले.
- दि. १४.११.२०२४ रोजी बालदिनानिमित्त शिक्षकांनी नृत्य व नाटाकांव्दारे विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले.
- सहल : दि. १६.१२.२०२४ रोजी तळजाई उद्यान येथे नेण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांना शाळेकडून जिलेबी देण्यात आली व श्री. लोंबर यांच्याकडून स्नॅक्स देण्यात आला.
  दि. २४.१२.२०२४ रोजी मोठया विद्यार्थ्यांची सहल दरेकर वाडा येथे नेण्यात आली होती.
- दि. ०१ व ०२.०२.२०२५ रोजी 'खेळ' या विषयावर तिन्ही शाळांचे एकत्रित प्रदर्शन भरविण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी चार्ट, प्रोजेक्ट करून आणले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय बुध्दीबळपटू श्री. जयंत गोखले यांच्या हस्ते करण्यात आले. विविध खेळ ठेवण्यात आले होते तर काही पालक व बाहेरील व्यक्तींना विक्री साठी स्टॉल देण्यात आले होते. खाण्यासाठी विविध खाद्यपदार्थ होते. प्रदर्शन छान झाले असा अभिप्राय खूप पालकांनी दिला. विक्री स्टॉल साठी ही पालकांचा सहभाग चांगला होता.
- दि. १९.०२.२०२५ रोजी शिवजयंती निमित्त विद्यार्थ्यांना शिवरायांचा चित्रपट दाखीवण्यात आला.
- दि. २६ व २७.०३.२०२५ रोजी लार्क व एम.ओ.व्ही.एस मधील विद्यार्थ्यांची एकत्रित प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली.
- यावर्षी विद्यार्थ्यांना गृहविज्ञान लेखी परीक्षा न घेता प्रात्यक्षिक परीक्षा घेतली. यात बुफे लंच ही संकल्पना ठेवली. प्रत्येक विद्यार्थ्यांनी सर्व कृती स्वत: केली. सर्व विद्यार्थी खुष होते.

सांस्कृतिक कार्यक्रम

| दिनांक | कार्यक्रम | पाहुणे / परीक्षक | स्पर्धा / कार्यक्रम |
|---|---|---|---|
| १८.०६.२०२४ | पर्यावरण दिन | - | प्रत्येक विद्यार्थ्याकडून कुंडीत भाज्यांच्या बिया लावून घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांने स्वत: लावलेल्या रोपांची काळजी विद्यार्थी घेणार आहेत. |
| २१.०६.२०२४ | योगा दिवस | - | विद्यार्थ्यांनी क्षमतेप्रमाणे आसनाचे पूर्व प्रकार व काही योगासने सादर केली. |
| २९.०६.२०२४ | पालखी | - | शिक्षक व विद्यार्थ्यांनी भक्ती गीत व नृत्य सादर केले. |
| २२.०७.२०२४ | गुरूपौर्णिमा | अक्षदा कुलकर्णी | वक्तृत्व स्पर्धा - विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी 'खेळ व खेळाडू' हा विषय देण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी छान सादरीकरण केले. |
| ०३.०८.२०२४ | लोकमान्य टिळक पुण्यतिथी | शाल्मली व्यास | पाढे पाठांतर स्पर्धा - शाब्दिक उदाहरणे व पाढे पाठांतर वादविवाद स्पर्धा - 'नोकरी की व्यवसाय ( काय करण्यास आवडेल ) |
| ०९.०८.२०२४ | हस्तकला स्पर्धा | सुनंदा जोशी | विषय : रिकाम्या कागदी बॉक्स पासून ट्रे तयार करून सजावट करणे |
| १६.०८.२०२४ | रक्षाबंधन | पार्थ तरडे | चित्रकला स्पर्धा |
| २७.०८.२०२४ | दही हंडी | - | विद्यार्थ्यांनी दही हंडीचे चित्र रंगून रंगविले. दहीकाल्याचा प्रात्यक्षिक करून घेण्यात आले व माहिती देण्यात आली. |

| दिनांक | कार्यक्रम | पाहुणे / परीक्षक | स्पर्धा / कार्यक्रम |
|---|---|---|---|
| दि. २९ ते ३०.०८.२०२४ दरम्यान | गणेशोत्सव | - | जीवन व्यवहार कृती स्पर्धा वर्गनिहाय घेण्यात आल्या. |
| ०४.०९.२०२४ | कै. पद्मजा गोडबोले आंतरवर्गीय कविता पाठांतर स्पर्धा | सौ. स्वाती कुलकर्णी | कविता पाठांतर स्पर्धा |
| १०.१०.२०२४ | शारदोत्सव | - | भोंडला करून शिक्षकांतर्फे विद्यार्थ्यांना खिरापत देण्यात आली. |
| ११.१०.२०२४ | खंडेनवमी | | कार्यशाळा विभागातील सर्व साहित्य व मशिनरीची पूजा |
| २५.१०.२०२४ | दिवाळी पार्टी | - | शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी किल्ला बनविला. नाच गाणी व खेळ खेळून दिवाळी साजरी केली. |
| ०७.१२.२०२४ | स्नेहसंमेलन विषय - 'मैत्री' | श्री. दत्तात्रय भावे | विद्यार्थ्यांनी विषयानुरूप नृत्य, नाटक सादर केले. |
| २०.१२.२०२४ | क्रीडा स्पर्धा | श्री. शुभम वाईकर | विविध स्पर्धांचे आयोजन |
| २६.०१.२०२५ | प्रजासत्ताक दिन | रिअर ॲडमिरल (निवृत्त) आशिष कुलकर्णी | विद्यार्थ्यांनी गाणे, घुंगरू काठी कवायत व मानवी मनोरे प्रात्यक्षिके सादर केली. |
| २७.०२.२०२५ | मराठी दिन | - | वर्गात इंग्रजी शब्दांना मराठी शब्दांची नावे विचारणे, पुण्यातील प्रमुख बाजारपेठा वर रस्त्यांची नावे, शब्दांचा खेळ |
| २८.०२.२०२५ | विज्ञान दिन | - | विद्यार्थ्यांना वर्गात प्रयोग करून दाखविले. तसेच बालकल्याण आयोजित विज्ञान प्रयोग स्पर्धेत सहभाग घेतला. |
| १९.०३.२०२५ | रंगपंचमी | - | विद्यार्थ्यांनी एकमेकांना रंग लावून आनंद साजरा केला. |
| २१.०३.२०२५ | बाजार दिन | - | विद्यार्थ्यांना वस्तू विक्री, खरेदी करणे याची माहिती मिळावी या उद्देशाने |

शैक्षणिक सहल / भेट

| गट | ठिकाण / स्थळ |
|---|---|
| क्लास २ | स्वामीज् कीचन |
| क्लास १, २ व ३ | अग्निशामक दल - एरंडवणा |
| शैक्षणिक वर्ष २०२३ - २०२४<br>शैक्षणिक वर्ष २०२४ - २०२५<br>चे नविन विद्यार्थी | मेट्रो सफर |
| क्लस १ व क्लास ३ | पी.वाय.सी डेक्कन जिमखाना |

वरील शैक्षणिक सहली मधून सामाजिक कौशल्य वाढावे, आजूबाजूच्या परिसराचे ज्ञान व्हावे, अभ्यासक्रमात ज्या गोष्टी आपण शिकतो त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा हा उद्देश साध्य होण्यास मदत झाली.

- दि. २८.०२.२०२५ रोजी ठराविक विद्यार्थी विद्यार्थीनी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त इंडियन डेन्टल असोशिएशन पुणे विभाग आयोजित दंत-आरोग्य जनजागृती प्रदर्शनाला भेट देवून माहिती घेतली.

मेडिकल चेकअप

- दि. २५.०९.२०२४ रोजी डॉ. मोघे व डॉ. प्रभुणे यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांचे मेडिकल चेकअप करण्यात आले.

ISO

- दि. २२.०८.२०२४ व दि. १७.०२.२०२५ रोजी Internal Audit हर्षा मुळे यांनी घेतले.
- दि. १९.११.२०२४ रोजी Surveillance Audit श्री. प्रविण चौधरी यांनी घेतले.

मिटिंग

- वर्षभर संचालिका हर्षा मुळे यांनी मुख्याध्यापिका व प्रभारी मुख्याध्यापिकेबरोबर पुढील मुद्यांवर मिटिंग घेतली /चर्चा केली / मार्गदर्शश केले :

| | |
|---|---|
| सांस्कृतिक | शाळेतील इतर कार्यक्रम व गणेशोत्सव, दिवाळी पार्टी, स्नेहसंमेलन व स्पोटस् डे तारखा, २६ जानेवारी कार्यक्रम, |
| शैक्षणिक | नविन ॲडमिशन, अभ्यासक्रम व वेळापत्रक, सहलीचे ठिकाण व नियोजन, शैक्षणिक सहली, फेब्रुवारी मधील एकत्रित प्रदर्शन आयोजन व नियोजन, प्रदर्शन मध्ये घेण्यात येणारे विषय व खेळ या संबंधी समितीबरोबर, स्टॉल व स्पर्धा, रिपोर्ट डे |
| फी | विद्यार्थी फी, वेळोवेळी फी चा फोलोअप, विद्यार्थी परिपत्रक, |
| व्यवस्थापन विभाग | पालक सभा, कॅन्टीन मेन्यू, कामाचे नियोजन व विभागणी, एज्युकेअर रिपोर्ट, Craftizen Capacity Building Program अंतर्गत झालेले ट्रेनिंग, कार्यशाळेतील ट्रेनिंग संदर्भात इंटर्नशिप विद्यार्थी, ISO Audit, मेडिकल चेकअप, बोनाफाईड, SLC किंवा इतर पत्र अर्ज आल्यानंतर दोन दिवसांनी द्यावी, देणगी धन्यवाद पत्र लगेच करणे, बाहेरील प्रदर्शात सहभाग व तयारी, बाहेरील कॉलेज व्हिजीट, पालक फीडबॅक, SSF, |
| शिक्षक | दिवाळी बोनस, शिक्षकांचे शाळेत येण्याच्या वेळा संबंधी, एप्रिल मधील शिक्षकांच्या वेळा, |
| इतर | विद्यार्थी युनिफॉर्म व शूज, नाताळ सुट्टी, २५ जानेवारी शाळा, एम.ओ.व्ही.एस - २५ वर्ष पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची यादी, प्रिझम वार्षिक सर्वसाधारण सभा तारीख, मे मधील मावश्यांच्या तारखा, १ जून कार्यक्रम इ. |
| बेन्यू कार्यशाळा | शिक्षक इन-हाउस ट्रेनिंग, शिक्षक कार्यशाळा, बाहेरील कार्यशाळा, कोर्स, पालक कार्यशाळा, GTBT Project, |
| पुढील वर्ष | नविन ॲडमिशन, कॅलेंडर, अभ्यासक्रम, वेळापत्रक, शिक्षक संख्या, फी, युनिफॉर्म व शूज, युनिफॉर्म बाबत विक्रेत्याशी बोलणे करणे, स्टेशनरी यादी, |

| | |
|---|---|
| मुख्याध्यापिकांनी शिक्षकांबरोबर | वैयक्तिकरित्या अभ्यासक्रम व वर्ग नियोजनाबाबत, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन व नियोजन, बाहेरील स्पर्धा, स्नेहसंमेलन, शैक्षणिक सहल, पालकसभा, क्रीडा दिन, दिवाळी ॲक्टिव्हिटी व शारदोत्सव,प्रदर्शन इ. |

- संचालिका हर्षा मुळे मॅ. यांनी शिक्षिकांबरोबर पुढील मुद्यांवर मिटिंग घेतली :
  शैक्षणिक वर्ष २०२४ - २०२५ पासून प्रभारी मुख्याध्यापिका म्हणून शिल्पा लोंबर या काम पाहतील.
  कामकाज व नियोजन बाबत, स्नेहसंमेलनाबाबत चर्चा, एकत्रित प्रदर्शन - विषय, विद्यार्थी प्रोजेक्ट, खेळ, वर्ग विभागणी आखणी व मांडणी इ.
- वेन्यू ट्रेनिंग इन्स्टिटयूटच्या मुख्याध्यापिका यांनी IEP बाबत सर्व शिक्षकांना माहिती दिली.
- वेळोवेळी ॲडमिन व अकांउट स्टाफ बरोबर कामासंदर्भात मिटिंग घेण्यात आल्या.
- दि. २६.०७.२०२४ रोजी विक्रेता सावी मॅन्युफॅक्चरिंग - चेतन शिंगवी यांच्याबरोबर विद्यार्थ्यांच्या युनिफॉर्म संदर्भात पालकांच्या खूप तक्रारी आल्यामुळे मिटिंग घेण्यात आली. पुढील वर्षी साठी दि. ०५.०३.२०२५ रोजी पुन्हा त्याच्याबरोबर विद्यार्थ्यांच्या युनिफॉर्म बाबत मिटिंग घेण्यात आली. यावर्षीप्रमाणे पुढील वर्षी पालकांच्या तक्रारी येता कामा नये असे सांगण्यात आले. दि. ११ ते १५ जून दरम्यान विद्यार्थ्यांच्या युनिफॉर्म ची मापे घेऊन जाणे. त्याप्रमाणे दि. ३० जून पर्यंत युनिफॉर्म पालकांना देण्यात येतील.
- दि. १०.१२.२०२४ रोजी वेन्यू च्या मुख्याध्यापिकेबरोबर GTBT सेशन्स विद्यार्थ्यांबरोबर घेण्यासंदर्भात
- दि. १९.०३.२०२५ रोजी वेन्यूच्या मुख्याध्यापिका विद्या भागवत यांनी मुख्याध्यापिकांची खालील मुद्यांवर मिटिंग घेतली : कॅलेंडर, अभ्यासक्रम, १ जून कार्यक्रम, नविन शिक्षक नेमणूक, पुढील वर्षी विद्यार्थ्यांसाठी शनिवारी शाळा असणार किंवा नसणार बाबत चर्चा, वेबसाईटसाठी बातमी देणे, शिक्षक हाफ डे, सरकारी ठिकाणी भेट देण्यापूर्वी ऑफीसमध्ये चौकशी करावी, स्टेशनरी यादी इ.
- संचालिका हर्षा मुळे सध्या भारताबाहेर असल्यामुळे यांच्याबरोबर WhatsApp call व्दारे शाळेतील कामकाजाबाबत वेळोवेळी चर्चा केली जाते.
- शाळेतील प्रत्येक शिक्षिकेबरोबर वेन्यू ट्रेनिंग इन्स्टिटयूटच्या मुख्याध्यापिका विद्या भागवत यांनी वैयक्तिकरित्या पुढील वर्षीच्या नियोजनावर चर्चा केली.

पालक सभा

- दि. २२.०६.२०२४ रोजी पहिली पालक सभा घेण्यात आली. यावेळी १९ पालक उपस्थित होते., संचालिका हर्षा मुळे यांनी संस्थेची माहिती सांगितली. विद्या भागवत यांनी वेन्यू प्रशिक्षण केंद्रातर्फे चालविले जाणारे कोर्स व पालक कार्यशाळेची माहिती दिली. मुख्याध्यापिका स्वाती सगम मॅ. यांनी शिल्पाा लोंबर या प्रभारी मुख्याध्यापिका म्हणून काम पाहतील हे सांगितले. तसेच शिल्पा लोंबर मॅ. यांनी फी, युनिफॉर्म, स्वच्छता, विद्यार्थ्यांची औषधे, उद्योग केंद्रातील व्यावसायिक कामकाजाबाबत माहिती दिली.
- दि. २५.०९.२०२४ रोजी Class III & Class IV ची पालकसभा घेण्यात आली. गृहविज्ञान अंतर्गत प्रात्यक्षिक करून घेण्यावर जास्त भर असणार आहे, लेखी पेपर नसतील. फिडबॅक भरताना कोणते मुद्दे लक्षात घेऊन भरावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.
- दि. २८.११.२०२४ रोजी पालकसभा घेण्यात आली. सभेत स्नेहसंमेलनाबाबत सूचना देण्यात आल्या.
- दि. ०३ व ०४.०३.२०२५ याकालवधीत प्रत्येक गटाची स्वतंत्रपणे पालकसभा घेण्यात आली.

स्पर्धा / कार्यशाळा

- दि. १८.०७.२०२४ बालकल्याण संस्था आयोजित फ्रेम तयार करणे स्पर्धेत शाळेने सहभाग घेतला होता. शाळेला व्दितीय क्रमाकांचे बक्षिस मिळाले.
- दि. २९ व ३०.०७.२०२४ रोजी बालकल्याण संस्थेने विद्यार्थ्यांसाठी मेंदी प्रशिक्षण आयोजित केले होते. या प्रशिक्षणात शाळेतील २ विद्यार्थीनी व एका शिक्षिकेने सहभाग घेतला.
- दि. ०९.०८.२०२४ रोजी कर्न्सन इंडिया फौंडेशन आयोजित समुह गायन स्पर्धेत शाळेने सहभाग घेतला होता.

- दि. १२.०८.२०२४ रोजी कामायनी शाळा - निगडी आयोजित सुगम गायन स्पर्धेत (वैयक्तिक) शाळेतील ३ विद्यार्थिनीनी सहभाग घेतला होता. सहभागी विद्यार्थीनींना पारितोषिक मिळाले.
- दि. २३.०८.२०२४ रोजी लायन्स क्लब इंटरनॅशनल आयोजित समूह गायन स्पर्धेत शाळेने सहभाग घेतला होता. शाळेला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.
- दि. ०५.१०.२०२४ रोजी कर्न्सन इंडिया फौंडेशन आयोजित चित्रकला स्पर्धेत शाळेने सहभाग घेतला होता.
- दि. २३.१०.२०२४ रोजी नवक्षितिज आयोजित आंतरशालेय नाटय स्पर्धेत शाळेने सहभाग घेतला होता. एका विद्यार्थ्याला अभिनयाचे व्दितीय क्रमाकांचे बक्षिस मिळाले.
- दि. ०१.०३.२०२५ रोजी बालकल्याण आयोजित' विज्ञान स्पर्धेत' शाळेने सहभाग घेतला होता. 'साधी यंत्रे' या विषयाला अनुसरून दाब, गती, घसरण हयावरील प्रत्यक्ष वस्तूंची मांडणी केली होती. मानस शर्मा, सुमेध भोसले, ऋतुजा खरे व मुक्ताई कुलकर्णी यांनी माहिती दिली.

बाहेरील कार्यशाळा

- दि. २७ व २८.०६.२०२४ रोजी बालकल्याण संस्था आयोजित 'नॅचरोपॅथी, योगासने व प्रथमोपचार' कार्य शाळेत स्नेहल वाळिंबे या शिक्षिकेने सहभाग घेतला होता.
- दि. १० ते १२.०७.२०२४ दरम्यान Craftizen Capacity Building Program अंतर्गत कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशळेस सुवर्णा वावळे या शिक्षिकेने सहभाग घेतला.

कार्यशाळा / कोर्स

- बेन्यू तर्फे शिक्षकांसाठी वर्षभर घेण्यात आलेल्या गप्पांगण कार्यशाळेत शाळेतील शिक्षकांनी स्वत: निवडलेल्या विविध विषयाची माहिती कार्यशाळेत दिली.
- दि. ०१.०३.२०२५ रोजी बेन्यू अंतर्गत शिक्षकांनी शैक्षणिक साधनांची मांडणी व माहिती दिली व चर्चा केली.

इंटर्नशीप

- सप्टेंबर, ऑक्टोबर, फेबुवारी व मार्च मध्ये कर्वे इन्स्ट्रिटयूटचा एक विद्यार्थीनी इंटर्नशीप साठी येत होती.
- मॉडर्न कॉलेज - टि.वाय बी.ए ची एक विद्यार्थिनी, डी.इ.एस सोसायटी ब्रिजलाल जिंदाल कॉलेज ऑफ फिजिओथेरपी चा एक विद्यार्थी, फर्ग्युसन कॉलेजचा एक विद्यार्थी, एस.एन.डी.टी कॉलेजच्या मानसशास्त्रीय विभागातील दोन विद्यार्थीनी आठवडयातून एक दिवस इंटर्नशिप साठी येत होत्या.

भेट

- दि. ०९.०८.२०२४ रोजी सिंम्बोयसिस कॉलेज सायकॉलॉजी डिपार्टमेंटचे एस.वाय व टि.वाय चे ८० विद्यार्थ्यांनी शाळेला भेट देवून माहिती घेतली.
- मॉडर्न कॉलेज सायकॉलॉजी डिपार्टमेंट मधील २ शिक्षक व ३५ विद्यार्थ्यांनी भेट देवून माहिती घेतली.
- दि. २१.०३.२०२५ रोजी ब्लू डायमंड मधील HR डिपार्टमेंटच्या लेले मॅ. व त्याचे १४ सहका-यांनी संस्थेला भेट देवून माहिती घेतली.
- MIT College - Psychology Department मधील २४ विद्यार्थ्यांनी शाळेला भेट देवून माहिती घेतली.

विद्यार्थी

- एक गैरहजर असलेल्या विद्यार्थ्याला शाळेकडून पत्र पाठविले आहे.

शिक्षक

- दि. ०९.१२.२०२४ रोजी नवक्षितीज तर्फे विशेष शिक्षक सन्मान सोहळा आयोजित केला होता. या सोहळयात शाळेच्या पर्यवेक्षिका शिल्पा लोंबर व शिक्षिका स्नेहल राऊत यांचा आदर्श शिक्षक म्हणून सन्मान करण्यात आला.
- दि. २८.०३.२०२५ रोजी वाकड येथील अदिराज फौंडेशन शाळेत कवायत स्पर्धा आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेच्या परिक्षक म्हणून मुख्याध्यापिका स्वाती सगम या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

कार्यशाळा विभाग

- वर्षभर वर्गातील विद्यार्थी दिलेल्या वेळापत्रकानुसार कार्यशाळेतील सर्व विभागात कामासाठी जात होती.
- जून - काही जुनी भांडी विकून त्या पैशात आणखी पैसे घालून नविन भांडी विकत आणली आहे. सर्व नविन भांडयाची नोंद करण्यात आली.
- मोठा Deep Freezer ची श्री. पटवर्धन सरांना विकत देण्यात आला. याची सर्व कागदपत्रेसुध्दा देण्यात आली आहेत.

उत्पादन

- गुरूकुल शाळेच्या १००१ फाईल्स् ची ऑर्डर पूर्ण करून देण्यात आली आहे.
- राखी पौर्णिमे निमित्त राख्या करण्यात येवून विक्री करण्यात आली.
  यावर्षी विद्यार्थ्यांना स्वत: विक्री करता यावी या हेतुने राखी व गणपती पूजेचा बटवा विक्री साठी देण्यात आले होते. विद्यार्थ्यांनीही उत्तम प्रतिसाद दिला.
- कलाक्षेत्रम दुकानातील १५०० साडी कव्हरची ऑर्डर पूर्ण करून देण्यात आली आहे.
- व्यास फौंडेशन यांची ५० भाजी पिशवी सेटची ऑर्डर पूर्ण करून देण्यात आली.
- ॲक्रोबेट याची २००० पणत्यांची ऑर्डर पूर्ण करण्यात आली. ही ऑर्डर पूर्ण करताना प्रिझम, लार्क व फिनिक्स शाळेची मदत झाली.
- जोशी फूड - बाणेर येथे चिंच सॉस विक्री साठी ठेवण्यात येत आहे.
- मागणीप्रमाणे कापडी भाजी पिशवी, साडी कव्हर, बटवे, चिंच सॉस, बिस्किटे, केक, मठरी व भडंग व वाढदिवस स्नॅक्स इ. बनविण्याचे काम ऑर्डर प्रमाणे सुरू आहे.

प्रदर्शन स्टॉल

- पूना क्लब आयोजित प्रदर्शनात शाळेने सहभाग घेतला होता. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी बनविलेल्या वस्तू विक्री साठी ठेवण्यात आल्या होत्या.
- दि. २३ व दि. २४.१०.२०२४ हे दोन दिवस प्रोत्साहन आयोजित प्रदर्शात शाळेने सहभाग घेतला होता. या प्रदर्शात शाळेतील वस्तू विक्री साठी ठेवण्यात आल्या होत्या. प्रतिसाद चांगला होता.
- दि. ०५ व ०६.१०.२०२४ रोजी सिल्करूट आयोजित उमंग
- दि. ०९.१०.२०२४ रोजी एस.एन.डी.टी बी.एड कॉलेज
- दि. १९ व २०.१०.२०२४ रोजी प्रोत्साहन व महाराष्ट्र मंडळ
- दि. १९ व २०.१०.२०२४ रोजी रोटरी क्लब ऑफ वेस्ट पूना आयोजित सृजन
- दि. ८ व ०९.०३.२०२५ रोजी सिल्करूट आयोजित विक्री

  वरील सर्व प्रदर्शनात शाळेने सहभाग घेतला होता. येथे विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंची विक्री करण्यात आली. स्टॉलला भेट देणा-या व्यक्तींना संस्थेची माहिती देण्यात आली.
  ऑक्टोबर मध्ये झालेल्या प्रदर्शनात प्रिझम, फिनिक्स व लार्क शाळेतील शिक्षकांची मदत झाली.

- दि. २९.0१.२0२५ रोजी औंध वाङमय मंडळ, औंध यांच्या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी बनविलेल्य वस्तू विक्री साठी ठेवण्यात आल्या होत्या. प्रतिसाद खूप छान होता.

दुरूस्ती

- आवश्यतेनुसार गॅस शेगडी, शिवण मशिन, क्रशर यांच्या दुरूस्तीचे काम करून घेण्यात आले.

इतर

- यावर्षी ही बालकल्याण संस्थेत महिन्याच्या पहिला, तिसरा व पाचव्या मंगळवारी विद्यार्थी ॲटिव्हिटी साठी जात होती.
- अतिवृष्टीमुळे दि. २५ व २६.0७.२0२४ रोजी सर्व विद्यार्थ्यांना सुट्टी देण्यात आली होती.
- शिक्षकांना दि. २५ रोजी सुट्टी देण्यात आली होती व दि. २६.0७.२0२४ रोजी शिक्षकांनी शाळेत येऊन कामकाज केले. दि. २६.0९.२0२४ शाळेला सुट्टी देण्यात आली होती.
- दि. १0.0९.२0२४ रोजी गौरी पूजनानिमित्त शाळेला ( सर्व विद्यार्थी व शिक्षक ) सुट्टी देण्यात आली होती.
- चिदानंद फौंडेशन आयोजित देणगी वितरण सोहळयात संस्थेतर्फे संचालिका व मुख्याध्यापिका सहभागी होत्या.
- दि. २५ हा चौथा शनिवार असला तरी २६ जानेवारीच्या तयारीसाठी पूर्ण वेळ शाळा ठेवण्यात आली होती.
- मुकेश प्रतिष्ठान आयोजित उपक्रमात छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथी निमित्त 'छाचा' चित्रपट विशेष विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. या उपक्रमात लार्क व एम.ओ.व्ही.एस शाळेतील ३0 विद्यार्थी सहभागी झाले होते.

देणगी स्वरूपात वस्तू

- सौ. दिक्षित यांनी शाळेला देणगी स्वरूपात रेफ्रीजरेटर दिला आहे.
- श्री. उदय गाडगीळ यांनी शाळेला अभ्यासक्रमाची पुस्तके अल्प दरात छपाई करून दिली आहे.
- विश्वस्त श्री. रोहीत ओगले यांच्याकडून देणगी मिळाली आहे.

स्वाती सगम<br>मुख्याध्यापिका<br>एम.ओ.व्ही.एस